MHSO110002342024

**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ८७/२०२४</u>**

रवींद्रकुमार व्होरा विरुध्द रवींद्र बु-हाडे

**<u>निशाणी क्र. ३० वरील आदेश</u>**

सदरचा अर्ज वादीने प्रतिवादी क्र. १ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेकामी झालेला उशिर माफ होवुन मिळणेसाठी केलेला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र ०१ रविंद्र सुर्यकांत बु-हाडे हे दिनांक ३१.०५.२०२५ रोजी मयत झाले आहेत. त्यांचा मयत दाखल त्यांनी अभिलेखावर दाखल केला आहे. प्रतिवादी क्र ०१ हे मयत झाल्याचे त्यांना उशिरा समजल्याने त्यांचे वारस रेकॉर्डवर आणणेकामी ४ महिने १० दिवसांचा विलंब झाला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र १ विरुध्द दावा ॲबेट झाला आहे. प्रस्तुत दावा हा स्थावर मिळकतीबाबत हद्दीखुणा कायम करुन मिळणे व निरंतर ताकीदीसाठी असल्याने मयत वारस रेकॉर्डवर न आणल्यास वादीचे कधीही न करुन येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब प्रतिवादीचे ०१ वारस रेकॉर्डवर घेणेकामी झालेला उशिर माफ होवुन त्यांचे कायदेशीर हयात वारस रेकॉर्डवर येणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांचे विधिज्ञांनी म्हणणे देवुन आक्षेप नोंदवला.

४. दावा आणि अभिलेखावरील अर्जाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा सदर हद्दीखुणा कायम होणेकामी तसेच निरंतरचे ताकीदीसाठी केला आहे. अशा दाव्याकरिता सर्व पक्षकारांचा समावेश दाव्याकामी असणे दाव्याच्या अंतिम निकालाकरिता आवश्यक आहे. सबब प्रस्तुत अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो :-

## **आदेश**

०१ वादीचा अर्ज निशाणी क्र. ३० मंजुर करण्यात येतो.

०२ प्रतिवादी क्र ०१ रविंद्र सुर्यकांत बु-हाडे यांच्या वारसांची नावे अभिलेखी घेण्यास झालेला झालेला उशिर हा वादीने रक्कम रूपये ४००/- (अक्षरी रूपय चारशे मात्र) पुढील तारखेपर्यंत विधी सेवा समीती, माळशिरस यांना देण्याच्या अटीवर माफ करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by RAJENDRA DHANAJI SHINDE
Date: 2026.08.13 17:49:09 +0530

दिनांक : १३/०८/२०२६

(आर. डी. शिंदे)
४थे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
माळशिरस, ता.सोलापूर

## C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this PDF file order are same word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| **Name of the Court** | **:** | 4th Jt. C.J.J.D & J.M.F.C., Malshiras. |
| **Name of Stenographer** | **:** | Praveen Nagnath Nalla |
| **Order signed by the Presiding Officer on** | **:** | 13 / 08 / 2026. |
| **Order uploaded on** | **:** | 13 / 08 / 2026. |